# महाराष्ट्र विधानसभा निवडणुक आणि पक्षीय संदर्भ

**प्रा. मुल्ला शाहीद मुस्ताक,** राज्यशास्त्र विभाग, वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड.

**प्रस्तावना :—**

भारताने संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केला आहे. संसदीय लोकशाही असणाऱ्या देशात निवडणुकीला अनन्य साधारण महत्व असते. लोकशाहीचा प्राण म्हणजे निवडणुका हे समिकरण लोकशाही व्यवस्थेत खूपच महत्वाचे मानले जाते. भारताने संसदीय पध्दतीचा स्विकार केला असल्यामुळे केंद्रात जी शासनव्यवस्था आहे तशीच शासनव्यवस्था घटकराज्यांतही आहे. महाराष्ट्राच्या कायदेमंडळामध्ये विधानसभा आणि विधानपरिषद व राज्यपाल यांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या कायदेमंडळाच्या प्रथम आणि कनिष्ठ सभागृह (विधानसभा) सदस्यांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून सार्वत्रिक प्रौढ मतदान पध्दतीद्वारे होते. महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत १३ विधानसभा निवडणुका झाल्या सध्या २०१९ साली महाराष्ट्रातील ही १४ वी विधानसभा निवडणुक खूपच महत्वाची असण्याचे कारण म्हणजे या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक स्थिंत्यंतरे घडून आलेली आहेत. ही स्थित्यंतरे घडून येण्यासाठी राजकीय पक्षांची भूमिका महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा विविध परिप्रेक्षातुन अभ्यास होणे खूप गरजेचे आहे. त्या अनुषंगाने विधानसभा निवडणुक आणि त्यांचा पक्षीय संदर्भातून अभ्यास होणे खूप महत्वाचे आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक राष्ट्रीय राजकीय पक्ष व प्रादेशिक पक्ष आहेत. ज्यांचा प्रभाव महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीवर प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा सदस्यांची संख्या २८८ इतकी आहे. या २८८ जागांसाठी महाराष्ट्रामध्ये २१ ऑक्टो. २०१९ मध्ये मतदान घेण्यात आले. त्यामध्ये राजकीय पक्षांची भूमिका खूपच महत्वाची ठरलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतील स्थित्यंतराचा अभ्यास करण्यासाठी पक्षीय संदर्भाचा विचार करणे खूप महत्वाचे आहे.

**उद्दिष्टये :—**

१) २०१९ च्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा आढावा घेणे
२) पक्षीय राजकारणाचा विधानसभा निवडणुकीवर पडलेला प्रभाव अभ्यासणे.
३) पक्षीय राजकारणांच्या बदलत्या संदर्भाचा अभ्यास करणे.
४) महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील राजकीय पक्षाच्या पक्षीय बलाबल अभ्यासणे.
५) निवडणुक पूर्व आणि निवडणुक पश्चात राजकीय पक्षांच्या विचारसरणीत झालेला जो बदल आहे त्याचा विश्लेषणात्मक आणि चिकित्सक अभ्यास करणे.
६) महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या प्रभावाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**व्याप्ती :—**

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती ही महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा पक्षीय संदर्भातून चिकित्सक आणि विश्लेषणात्मक अभ्यास करणे व बदलत्या पक्षीय संदर्भाचा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे. २०१९ च्या १४ व्या विधानसभा निवडणुकीचा पक्षीय संदर्भातून धावता आढावा घेऊन पक्षीय राजकारणाचा महाराष्ट्राच्या एकूण राजकारणावर जो परिणाम झाला आहे. त्याची कारणमिमांसा अभ्यासून महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकीय पक्षांच्या प्रभावाचा व परिणामाचा अभ्यास करणे. आणि राजकीय अभ्यासकांना महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९च्या विधानसभा निवडणुकीने जो पेच निर्माण झाला आहे. त्यांचा एकूण पक्षीय राजकारणाशी असणारा संबंध स्पष्ट करुन त्यांना महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतील स्थित्यंतराची व परिणामांची ओळख करुन देणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुतशोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला असून संदर्भग्रंथ, वृत्तपत्र, इंटरनेट, लेख, मासिके इ. चा आधार घेवून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय विवेचन :—**

लोकशाही व्यवस्थेत राजकीय पदाचे स्थान अतिशय महत्वपूर्ण असते. कारण राष्ट्राच्या धोरण निर्धारण प्रक्रियेत राजकीय पक्षाची भूमिका खूप महत्वाची असते. 'समान विचारधारा किंवा तत्वप्रणालीने एकत्रित येवून सत्ताप्राप्तीच्या उद्देशाने एकत्रित आलेली संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय.' सत्ता प्राप्ती हा राजकीय पक्षांचा उद्देश असल्याने समाजातील सर्व गट वर्गांना बरोबर घेवून जाण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करत असतात. महाराष्ट्रात मार्च २०१९ अखेर १४५ नोंदणीकृत पक्ष २ प्रादेशिक राज्यस्तरीय पक्ष आहेत. महाराष्ट्रात राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी, बी.जे.पी., जनता दल, शिवसेना, समाजवादी पक्ष, रि.पा.इ. मार्क्सवादी कम्यूनिस्ट, शेतकरी कामगार पक्ष, जनसुराज्य, मनसे, एम.आय.एम, वंचित बहुजन विकास आघाडी या सारखे अनेक पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात पहावयास मिळतात व या राजकीय पक्षांचा प्रभाव महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांवर पडल्याचे दिसते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर १९७२ पर्यंत कॉंग्रेस पक्षाची सत्ता / राजवट महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रबळ सत्ताधारी पक्ष म्हणुन होती. पण १९७५ नंतर कॉंग्रेस पक्षाची पडझड होण्यास सुरुवात झाली. आणि कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव क्षीण होण्यास सुरुवात झाली याची प्रमुख कारणे म्हणजे कॉंग्रेस नेत्यांमधील वाढती फुटीरतावादी वृत्ती, कॉंग्रेस नेत्यांकडून कॉंग्रेसचे झालेले खच्चीकरण, पक्षांतर्गत हेवेदावे. तत्वहीन राजकारण यामूळे कॉंग्रेसचा प्रभाव कमी होऊन १९७८ पासून महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडयाच्या राजकारणाला सुरुवात झाली. कोणत्याच पक्षाला स्वबळावर सत्ता स्थापण करता येत नसल्यामुळे मित्रपक्षांच्या सहकार्याने सरकार बनवण्याचे जे प्रयोग सुरु झाले त्याला आघाडयांचे राजकारण असे म्हणतात. त्यामुळे अस्थिर शासन अस्तित्वात येवू लागले. त्यामुळे आघाडी शासन निर्माण होण्याची कारणे अभ्यासणे खूप महत्वाचे आहे.

१) पक्षांतर्गत होणारी बंडखोरी
२) पक्षीय राजकारणात होणारे बदल. (एक पक्षीय पासून बहुपक्षाकडे वाटचाल)
३) विविध जाती समुहातील राजकीय जागृती
४) सामाजिक परिस्थितीचा प्रभाव
५) कॉंग्रेस पक्षाची पडझड.

यासारखी अनेक कारणे महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडयांचे राजकारणाला सुरुवात होण्यास कारणीभूत आहे. आघाडयांच्या राजकारणाची सुरुवात महाराष्ट्रात १९७८ पासून झाल्याची दिसून येते. सध्या कॉंग्रेस—राष्ट्रवादी मित्रपक्षांची आघाडी तर भाजप शिवसेनेची युती पाहवयास मिळते.

महाराष्ट्र विधानसभेची सदस्य संख्या २८८ इतकी आहे. भारतीय घटनेच्या कलम १७० व्या कलमात विधानसभेबाबत तरतुद करण्यात आली आहे. २०१९ च्या १४ व्या विधानसभा निवडणुकीत भाजपा सेना युती होऊन कॉंग्रेस राष्ट्रवादीने आघाडी करुन निवडणुक लढवली. राज्यनिर्वाचन आयोगाने २७ सप्टें २०१९ ला निवडणुक कार्यक्रम जाहीर केला त्यानुसार ४ ऑक्टोंबरला अर्ज भरणे, ५ छाणणी, ७ ला माघार घेणे, २१ ला निवडणुका व २४ ला निकाल असा कार्यक्रम आखण्यात आला या निवडणुकीत भाजप सेनेच्या युती सरकारचे नेतृत्व फडणवीस यांनी केले तर कॉंग्रेस आघाडीचे नेतृत्व शरद पवार यांनी केले वैचारिक मतभेद असून ही हे पक्ष फक्त विशिष्ट पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी एकत्रित येवून निवडणुक लढवताना दिसले. सन २०१४ साली झालेल्या निवडणुकीत प्रत्येकपक्षाने स्वबळावर निवडणुक लढवली पण २०१४ च्या निवडणुकीत ही कोणत्याच पक्षाला बहुमताचा आकडा पुर्ण न करता आल्यामुळे निवडणुकीनंतर शिवसेना—भाजपा व कॉंग्रेस राष्ट्रवादी यांच्या आघाडया झाल्याचे चित्र त्या निवडणुकीत पाहवयास मिळाले. पण २०१९ साली निवडणुक आधीच या पक्षांनी आघाडया स्थापन करुन निवडणुक लढवल्या याची काही महत्वपूर्ण अशी कारणे आहे की ज्यामुळे या पक्षांनी स्वबळावर निवडणुक न लढवता आघाडया स्थापण करुन निवडणुक लढवल्या. त्याची कारणे पुढील प्रमाणे.

१) मागील निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न झाल्यामुळे.
२) जनतेच्या मुलभूत प्रश्नांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष.
३) पक्षांतर्गत हेवेदावे, वैचारिक मतभेद याची जनतेने घेतलेली दखल.
४) विशिष्ट राजकीय पक्षाच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे.

**२०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत २०१९ च्या निवडणुकीतील झालेला बदल किंवा तुलनात्मक अभ्यास :—**

सन २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना, कॉग्रेस व राष्ट्रवादी हे चारही पक्ष स्वबळावर निवडणुकीला सामोरे गेले होते. तर २०१९ च्या निवडणुकीत हे पक्ष युती व आघाडीने निवडणुकीला सामोरे गेले. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत कॉग्रेसचा प्रभाव हा कमी झाला त्याचे पडसाद विधानसभा निवडणुकीवर ही पडले २०१४ ची निवडणुक ही महाराष्ट्राच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली आहे. या निवडणुकीवर मोदींचा प्रभाव होता त्यांनी भाजपचा प्रभाव निर्माण करण्यासाठी २६ सभा घेतल्या होत्या. त्याचा परिणाम असा झाला की मोदी लाटेमुळे महाराष्ट्रात देखील २८८ जागांपैकी भाजपला १२२ जागा मिळाल्या व कॉग्रेसला फक्त ४२ राष्ट्रवादीला ४१ शिवसेना ६३ जागा मिळाल्या व मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाला १, मनसे १, एमआयएम २ बहुजन विकास आघाडीला ३, भारिप बहुजन महासंघ १, शेकाप ३, राष्ट्रीय समाज पक्षाला १, समाजवादी १, अपक्ष १ अशा जागा मिळाल्या व भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. आणि २०१४ च्या निवडणुकती भाजप शिवसेना युतीचे सरकार सत्तेवर आले. व मुख्यमंत्री म्हणुन फडणवीस यांनी काम पाहिले. परंतु हे सरकार आपले काम जबाबदारीने करु शकले नाही. परिणामी वैचारिक मतभेद असतानाही सन २०१९ साली विधानसभा निवडणुकीत फक्त हिंदुत्ववाद, शेतकऱ्यांचे प्रश्न, विशिष्ट पक्षाला सत्तेपासून लांब ठेवण्यासाठी यासारख्या समान कार्यक्रमासाठी एकत्रित येवून विधानसभा निवडणुक लढवल्याचे दिसून येते. २०१९ च्या निवडणुकीत हे चित्र पूर्णपणे बदललेले दिसते. आम्ही फक्त शासन स्थिर रहावे यासाठी हा बाहेरुन पाठींबा दिला होता असे शरद पवार म्हणाले, म्हणुन आज खरे पाहता महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षनिष्ठतेचा व तत्वहीन राजकारणाचा शिरकाव झाल्याचे दिसते. म्हणुन २०१४ च्या तुलनेत २०१९ ची निवडणुक खूपच निर्णायक व लक्षवेधी असल्याचे दिसते.

**२०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील विविध पक्षांची भूमिका :—**

२०१९ च्या १४ व्या विधानसभा निवडणुकीच्या आधीच काही पक्षांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली होती त्यामध्ये मुख्यमंत्र्यांची जनादेश यात्रा, आदित्य ठाकरेंची जनआर्शिवाद यात्रा, राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा व कॉग्रेसची महापर्दाफाश यात्रा राज्यात झाल्या. राज्यातले सहा प्रमुख पक्ष भाजप, शिवसेना, कॉग्रेस, राष्ट्रवादी, वंचित बहुजन आघाडी आणि मनसे यांची २०१९ च्या निवडणुकीतील भूमिका पुढील प्रमाणे

**भाजप :—**२०१९ साली केंद्रात सत्तेवर आल्यानंतर भापजचा आत्मविश्वास खूप वाढलेला होता. त्यामुळे भाजपला आपण महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता स्थापन करु शकतो असा आत्मविश्वास होता. त्यामुळे भाजपने स्थानिक मुद्यांवर निवडणुक न लढवता जम्मुकश्मिर संदर्भातील ३७० कलम हटवल्यानंतर राज्यात उत्साहाचे वातावरण आहे. असे भाजपला वाटत होते. पण भारतीय जनता पक्षाने फोडाफोडीच्या राजकारणाला सुरुवात करुन कॉग्रेस व राष्ट्रवादीचे आमदार आपल्याकडे वळवून फोडाफोडीचे राजकारण करण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर पीक विमा, कर्जमाफी, नोकरी व व्यवसाय संधीत झालेली घट त्यामुळे आर्थिक संकटाचा सामना भाजपला न करता आल्याने भाजप बद्दल लोकांची मानसिकता बदललेली दिसते. साहजिकच त्याचा परिणाम भाजपाला निवडणुकीत सहन करावा लागल्याचे दिसून येते.

**शिवसेना :—**२०१४ साली शिवसेना आणि भाजप युतीचे सरकार सत्तेवर होते. पण सत्तास्थापनेनंतर नेहमीच भाजपकडून अपमानास्पद वागणुक सेनेला मिळाल्याचे दिसत होते. २०१४ च्या निवडणुकीत शिवसेनेचे ६३ आमदार निवडूण आले होते. भाजपविरोधी शिवसेनेने वेळोवेळी सत्तेत असताना नाराजी व्यक्त केली होती. भाजपच्या हुकूमशाही प्रवृत्तीचा शिवसेनेने नेहमीच विरोध केला होता. त्यामुळे २०१९ च्या निवडणुकती शिवसेनेचा पाया चांगला होता. शिवसेनेने हिंदुत्व आणि राष्ट्रवादाच्या मुद्यावर तसेच राममंदिर, सावरकर या मुद्यावर आपण भाजपपेक्षा आग्रही आहोत असें शिवसेनेने दाखवले. शिवसेनेने जरी भाजप सोबत अंतर ठेवलेले असले तरी या २०१९ च्या निवडणुकीत पुन्हा भाजप आणि शिवसेनेची युती होवून त्यांनी निवडणुक लढवली. पण त्यांच्यातील अंतर्गत वाद खूपच टोकाला जावून पोहचल्यामुळे त्यांच्यात एकमत झाले नाही. परिणामतः युतीत फुट पडल्याचे दिसते.

**कॉंग्रेस :—**कॉंग्रेस पक्ष हा भारतातील सर्वात मोठा व जूना पक्ष आहे. पण कॉंग्रेस पक्षाअंतर्गत बंडाळी होऊन, तसेच कॉंग्रेस मधील वैचारिक मतभेदामुळे २०१४ च्या निवडणुकीपासून कॉंग्रेसचा प्रभाव राष्ट्रीय व राज्य पातळीवर क्षीण झाल्याचे दिसते. सन २०१४ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला ४२ जागा मिळाल्या होत्या. व विरोधी पक्षाच्या भूमिकेत कॉंग्रेसने कामगिरी पार पाडली होती. पण २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस राष्ट्रवादीने आघाडी करुन निवडणुक लढवली. या निवडणुकीत २ सिटचा फायदा कॉंग्रेसला झाला. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर राहूल गांधीनी राजीनामा दिला व सोनिया गांधींनी हंगामी अध्यक्ष म्हणुन जबाबदारी घेतली. त्यांनी आर्थिक मंदी, कमी नोकऱ्या, डळमळीत झालेला गुंतवणुकदारांचा विश्वास यासारखे महत्वाचे मुद्दे कॉंग्रेसने अधोरेखित केले. २०१४ च्या निवडणुकीत हे दोन्ही पक्ष स्वतंत्र लढली होती. पण २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत यांनी आघाडी करुन १२५—१२५ जागावर व मित्रपक्षांसाठी ४८ जागांवर निवडणुक लढवली. राज्यात विखे पाटलांनंतर (भाजप प्रवेश) प्रदेशाध्यक्ष म्हणुन बाळासाहेब थोरात यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणुन जबाबदारी पाहिली. अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण यासारख्या नेते मंडळींनी खूप चांगली कामगिरी केल्याचे दिसते.

**राष्ट्रवादी (NCP) :—**महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावी व गतिमान नेतृत्व म्हणुन प्रतिमा असणारे नेते शदर पवार हे या पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. व २०१९ च्या निवडणुकीत आघाडीचे नेतृत्व म्हणुन त्यांनी महत्वाची भूमिका बजावली, २०१४ ला ४१ जागा राष्ट्रवादीस मिळाल्या होत्या पण २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी बद्दल जनमानसिकता बदलण्याचे महत्वाचे कारण म्हणजे शरद पवार साहेबांनी निवडणुकीसाठी घेतलेले अथक परिश्रम त्याचबरोबर भाजपने राष्ट्रवादीच्या आमदारांची केलेली गळती, पवारसाहेबांबद्दल वाटणारी आत्मीयता, नवीन नेतृत्वाला पक्षात दिलेल्या संधी 'Incoming Outgoing' हे समिकरण खूपच महत्वाचे आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका खूपच निर्णायक व लक्षवेधी ठरली आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादीला ५६ जागा मिळाल्या.

**वंचित बहुजन आघाडी :—**१४ व्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी स्थापन झालेली वंचित बहुजन आघाडी कॉंग्रेस पक्षाच्या पराभवाला कारणीभूत ठरली आहे. २०१९ च्या निवडणुकीत बहुजन समाजातील विविध जातींच्या लोकांना तिकीट देवून प्रकाश आंबेडकरांनी 'सोशल इंजिनिअरिंगचा' फॉर्मुला राबवला विधानसभेच गणित हे उमेदवार, मुद्दे आणि पक्ष यावर अवलंबून असते. यासमिकरणात बहुजन आघाडी कोठे तरी कमी पडल्याचे दिसते या पक्षाने फक्त दलित आणि अल्पसंख्यांक या मुद्यावर निवडणुक लढवली कोणताच मोठा इनक्लूजिव्ह अजेंडा या पक्षाकडे नव्हता. पण तरी देखील महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळे वळण येण्यास वंचित आघाडी कारणीभूत असल्याचे दिसते.

**मनसे :—**२००९ ला नव्याने महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केलेल्या मनसेला २००९ च्या निवडणुकीत १३ आमदार निवडुण आणता आले पण त्यानंतर मनसेचा प्रभाव अतिशय कमी झाला व २०१४ च्या विधानसभेत मनसेला फक्त १ जागा मिळाली. या २०१९ च्या निवडणुकीत मनसेची भूमिका कॉंग्रेस—राष्ट्रवादीच्या फेवरमध्ये असल्याची दिसते. योग्य नेतृत्वाचा आभाव असल्यामुळे फक्त १५ जागांवर निवडणुक या पक्षाने लढवली.

या सारख्या अनेक लहान गटांची व पक्षांची भूमिका महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महत्वाची असल्याचे दिसते. जात, धर्म, गट, समुह याची अनेक समिकरणे मांडून राजकीय पक्षांकडून आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते.

**२०१९ विधानसभा निवडणुकीचे विश्लेषण:—**

२१ ऑक्टोंबर रोजी महाराष्ट्रमध्ये १४ वी विधानसभा निवडणुक पार पडली. या निवडणुकीत एकूण २८८ जागासाठी ३२३७ (२३५ महिला) उमेदवार रिंगणात उतरले होते. या निवडणुकीत मतदारांची संख्या होती आठ कोटी ९८ लाख ३९ हजार ६०० त्यापैकी पुरुष मतदार — ४,६८,७५,७५०, स्त्री मतदार — ४,२८,४३,६३५ दिव्यांग मतदार — ३,९६,०००, तृतीयपंथी मतदार — २६३४, सर्व्हिस मतदार — १,१७,५८१ इ. एकूण मतदान केंद्रे ९६, ६६१ होती. २०१४ च्या तुलनेत २०१९ च्या निवडणुकीत मतदानाचा टक्का घटला आहे. २०१४ साली ६३.१३% मतदान झाले होते. तर २०१९ ला मतदानाचा टक्का ६०.४६% इतका घटल्याचे दिसते. ग्रामीण

भागात मतदानाचा टक्का वाढला आहे तर शहरी भागात मतदानाचा टक्का घसरल्याचे दिसते. निवडणुकीनंतर जो एक्झिटपोल होता त्यामध्ये भाजप २०० चा आकडा पार करेल असे वाटत होते. न्यूज १८ लोकमतच्या IPSOS च्या पोलनुसार भाजप युतीला २४५ कॉंग्रेस आघाडीला ४१ तर इतर ४ असा अंदाज होता पण निकालानंतर हा अंदाज चुकीचा ठरला या निवडणुकीत भाजप–१०५, शिवसेना–५६, कॉंग्रेस–४४, राष्ट्रवादी–५६ इतर–२९ अशा जागा मिळाल्या. २०१९ च्या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे आज महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवाच पेच निर्माण झाला असल्याचे दिसते.

**आढावा पक्षांचा :–**

शेतकऱ्यांचे प्रश्न, वाढती बेरोजगारी यामुळे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जनमत तयार होत होते. याचा फायदा कॉंग्रेस पक्षाला झाला. २०१४ च्या निवडणुकीत कॉंग्रेसला ९५ लाखच्या जवळपास म्हणजे एकूण १८% मते मिळाली व ४२ जागा मिळाल्या पण यावेळी कॉंग्रेसच्या दोन जागा वाढल्या पण एकूण मतांमध्ये घट झाली एकूण मताच्या १५.१७% मते कॉंग्रेसला मिळाली व दलित अल्पसंख्यांक वर्ग पुन्ह: कॉंग्रेसकडे वळला आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादीचा परफॉर्मन्सही निवडणुकीत चांगला होता. मागील विधानसभेत ४१ जागा होत्या पण २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत १६ जागा वाढल्याचे दिसतात. भाजप व सेनेला आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. कारण २०१४ पेक्षा २०१९ च्या निवडणुकीत भाजपसेनेच्या जागांमध्ये घसरण झाल्याचे दिसते.

**निष्कर्ष :–**

प्रस्तुत शोधनिबंधातुन असा निष्कर्ष निघतो की महाराष्ट्रात २०१९ च्या निवडणुकीत जो राजकीय पेच निर्माण झाला आहे या सर्व परिस्थितीमागे राजकीय पक्षांची तत्वहीनता, स्वार्थी वृत्ती हाच घटक कारणीभूत आहे कारण जनमताचा कौल हा सेना भाजपला होता तर विरोधी पक्ष म्हणुन कॉंग्रेस राष्ट्रवादीला कौल होता पण जनमताचा आदर न करता राजकीय पक्षांनी सत्तेच्या लोभापोटी महाराष्ट्राला राष्ट्रपती राजवटीच्या संकटात आणल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणातील राष्ट्रपती राजवटीची ही तिसरी वेळ आहे. राजकीय पक्षांच्या स्वार्थी, लोभी वृत्तीमुळे राष्ट्रपती राजवटीचे संकट निर्माण झाल्याचे दिसते. एकंदरीत महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रपती राजवट, 'महाविकास आघाडी' या सारखी जी स्थित्यंतरे घडत आहे त्यामागे राजकीय पक्षांची भूमिका खूप महत्वाची असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. डॉ. अशोक जैन – 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', प्रथम आवृत्ती, १९९८ सेठ पब्लिकेशन

२. प्रा. सुहास गो, न्हिवेकर – 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', प्रथम आवृत्ती, २००८ विदयासुरभी प्रकाशन

३. डॉ. प्रकाश पवार – 'कॉंग्रेस पुढील आव्हाने आणि भाजपचा उदय', प्रथम आवृत्ती जानेवारी २०१६, डायमंड पब्लिकेशन

४. सुभाष कश्यप, एबीपी माझा वरील मुलाखत

५. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र बातमी

६. दैनिक लोकमत

७. दैनिक पुढारी

८. बीबीसी मराठी न्यूज